**आर बी आय/ २००६ -०७/ ४८**
**संदर्भ डी पी एस एस (सीओ) क्र. ५/ ०४. ०१. ०१/ २०००६-०७**

जुलै ०४, २००६

इलेक्ट्रॉनिक समाशोधन सेवा ( डेबिट समाशोधन ) मध्ये भाग घेतलेल्या सर्व बँकांसाठी

**इलेक्ट्रॉनिक समाशोधन सेवा - ( ईसीएस) डेबिट समाशोधन - ग्राहक निर्देश**

ईसीएस खालील व्यवहार सध्या झपाट्याने वाढत आहेत. डेबिट समाशोधन व्यवहारांच्या वाढीचा वेग हा क्रेडिट समाशोधन पेक्षा अधिक आहे. तसेच ई सी एस चा उपयोग सध्या वेगवेगळी बिलं भरण्यासाठी ( यु टी ली टी पेमेंटस ) मोठ्या प्रमाणावर केला जात आहे.

२. या सुविधेसाठी खात्यावरून बिलाची रक्कम वजा होऊन संबंधित खात्याला जमा करण्यासाठी खातेधारकांनी संस्थेला दिलेल्या निर्देशांनुसार ई सी एस कार्य करते. ई सी एस मधून डेबिट संबंधी मिळालेल्या सूचनांचा खरेपणा पडताळून पाहण्यासाठी खातेधारक किंवा संस्थेकडून संबंधित बँकेला निर्देशाची एक प्रत पाठविण्यात येते.

३. आर बी आय ने नुकत्याच केलेल्या एका पाहणीत असे आढळून आले की बँकांच्या अनेक शाखा हे निर्देश फॉर्म व्यवस्थित ठेवत नाहीत आणि ते नियमित स्वरूपाच्या कामाप्रमाणे समाशोधन केंद्राकडून मिळालेल्या ई सी एस (डेबिट ) फाईलच्या आधारावरच खाताधारकाचे खाते डेबिट करतात. बँकांच्या शाखांच्यामते त्यांच्या सॉफ्टवेअर मध्ये निर्देश जतन करण्याची सुविधा नाही. आणि असलीच तर एक किंवा दोन निर्देशांचीच सोय असते पण खातेधारक त्यांच्या खात्यातून ई सी एस खाली रक्कम डेबिट करण्याचे निर्देश अनेक युटीलीटी संस्थांना देतात.

४. या संदर्भात, डेबिट निर्देश व्यवस्थापन प्रणाली आंतरिक प्रबंधन कार्याचा एक भाग असली पाहिजे. वैय्यक्तिक व्यवहारांमध्ये या निर्देशांमध्ये वैधता अवधि व अधिकतम रक्कम यांचाही समाव्रश असावयास पाहिजे, ही अधिकतम सीमा प्रत्येक निर्देशांमध्ये वेगवेगळी असू शकते. डी पी एस एस ( सीओ ) सं. ९५०/ ०४.०१.०१/ २००५-०६ डिसेंबर २३, २००५ च्या परिपत्रकाद्वारे आम्ही असे कळविले आहे की ग्राहकांकडून निर्देश रद्द करण्याच्या सूचना चेक समाशोधन प्रणालित ' स्टॉप पेमेंट' सूचनांप्रमाणे मानल्या जाव्यात. म्हणून निर्देश व निर्देश रद्द करणे ( असल्यास) त्याचे रेकॉर्ड ठेवण्याची पर्याप्त काळ्जी घेतली आहे याची खात्री करावी.

५. आपणांस विनंती आहे की लवकरात लवकर ई सी एस ( डेबिट) व्यवहार हाताळण्यासाठी उचित निर्देश प्रबंधन व्यवस्था लागू करण्यासाठी पावले उचलावीत.

कृपया पोच द्यावी व वरील निर्देशांचे अनुपालन व्हावे.

आपला विश्वासू,

(के. एन. कृष्णमूर्ती )
महा व्यवस्थापक